# जीवनासाठी तत्त्वज्ञानाची गरज : जोशी



**अनिता मुरजानी यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन करताना प्रा. जोशी. या वेळी (डावीकडे) सुप्रिया लिमये.**

'भौतिक जीवनातील प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी बाह्य जगाऐवजी अंतर्मनात डोकावण्याची गरज असते, तसेच जीवन उन्नत करण्यासाठी तंत्रज्ञानाबरोबरच तत्वज्ञानाची आवश्यकता आहे,' असे मत साहित्यिक प्रा. मिलिंद जोशी यांनी मांडले.

'वॉव पब्लिकेशन'च्या वतीने अनिता मुरजानी यांनी लिहिलेल्या 'आणि त्या दिवशी माझा मृत्यू झाला' या पुस्तकाचे प्रकाशन प्रा. जोशी यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. 'बुक गंगा'च्या संचालिका सुप्रिया लिमये या वेळी उपस्थित होत्या.

'मी कोण आहे, याचा शोध घेणे हे जीवनाचे अंतिम सत्य आहे, जीवनात ताणतणाव घेऊ नका, भविष्याचा विचार करू नका, जगत असलेला प्रत्येक क्षण उत्तम करण्याचा प्रयत्न करा, जीवनाचा हेतू हसणे आणि निरपेक्ष प्रेम करणे असा आहे,' असे मत मुरजानी यांनी मांडले.